**नि. फौ. ख. क्र.३९१/२०१८**

सरकार वि. गणेश घोडके.

**नि.क्र.२३**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

**<u>माझे नाव– संतोष दगडूदास कदम ,</u>**

वय–४२ वर्षे, व्यवसाय–शेती,

रा. चिखली, ता.इंदापूर, जि.पुणे.

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. पी. कुचेकर, यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

दि.११/०५/२०१८ रोजी काय झाले मला माहिती नाही. असे काही घडले नाही की, दि.११/०५/२०१८ रोजी आरोपी हा चोरीची वाळू घेवून जात होता त्यावेळी पोलीसांनी त्याला पकडले व माझेसमक्ष त्याचेकडे चौकशी केली.

*<u>(साक्षीदार त्याच्या पुर्वीच्या बयानाशी विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी वकिलांनी उलटतपासात ग्राहय असलेले प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली–परवानगी देण्यात आली.)</u>*

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.११/०५/२०१८ रोजी सकाळी ०७.४५ वाजताच्या सुमारास मी बारामती कळंब रोडने बारामतीला मोटारसायकलवरून जात असताना तलाठी शिवाजी खोसे व कोतवाल अनिल गायकवाड यांनी एक वाळूने भरलेला टिपर खुळेवस्ती येथे थांबवला होता. हे म्हणणे खरे नाही की, ते त्याचे चालकाबरोबर बोलत होते त्यावेळी वस्तीवरील लोक जमा झाले होते म्हणून मी देखील त्या ठिकाणी जावून पाहिले असता तलाठी व कोतवाल चालकाला वाळूबाबत त्याचेकडे पावतीची विचारणा करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, चालकाने त्याचेकडे कोणतीही पावती किंवा रॉयल्टीची पावती नसल्याचे सांगितले आणि खोसे यांनी चालकाला त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव दादा घोडके रा.कळंब असे सांगून मालकाबाबत

विचारले असता टिपर शब्बीर शेख, रा.कळंब यांचा असल्याचे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, चालकाला टिपरमध्ये वाळू कोठून भरली आहे असे विचारत असताना त्याने टिपर चालू करून बारामती बाजूकडे पळवून नेला. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी तलाठी, कोतवाल यांनी मोटारसायकलवरून त्याचा पाठलाग केला त्यानंतर मी माझे कामाला निघून गेलो. हे म्हणणे खरे नाही की, दुसरे दिवशी समजले की, तलाठी खोसे यांनी पोलीस स्टेशनला झालेल्या प्रकाराबाबत तक्रार दिली, सदरचा प्रकार माझेसमक्ष झाला असून तो बरोबर आहे. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ वाचून दाखविला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. पोलीसांनी तो तसा का नमूद केला याचे कारण मला सांगता येणार नाही. आरोपी व मी एकाच परिसरात राहणारे आहोत.

उलटतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे श्री.एच.डी.नरुटे, विधीज्ञ यांचेमार्फत –**

३. उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–
**( ए. बी. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.०२/०३/२०२६**

**नि. फौ. ख. क्र.३९१/२०१८**

सरकार वि. गणेश घोडके.

**नि.क्र.२४**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

**<u>माझे नाव– कैलास रामदास निकम ,</u>**

वय–५४ वर्षे, व्यवसाय–शेती,

रा. चिखली, ता.इंदापूर, जि.पुणे.

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. पी. कुचेकर, यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

दि.११/०५/२०१८ रोजी काय झाले मला माहिती नाही. असे काही घडले नाही की, दि.११/०५/२०१८ रोजी आरोपी हा चोरीची वाळू घेवून जात होता त्यावेळी पोलीसांनी त्याला पकडले व माझेसमक्ष त्याचेकडे चौकशी केली.

***<u>(साक्षीदार त्याच्या पुर्वीच्या बयानाशी विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी वकिलांनी उलटतपासात ग्राहय असलेले प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली–परवानगी देण्यात आली.)</u>***

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.११/०५/२०१८ रोजी सकाळी ०७.४५ वाजताच्या सुमारास मी आमचे घरीच असताना रोडवर बोलण्याचा आवाज आला म्हणून पाहिले असता तलाठी शिवाजी खोसे व कोतवाल अनिल गायकवाड यांनी एक वाळूने भरलेला टिपर आमचे खुळेवस्ती समोर रोडवर थांबवला होता. हे म्हणणे खरे नाही की, ते त्याचे चालकाबरोबर बोलत होते त्यावेळी वस्तीवरील लोक जमा झाले होते म्हणून मी देखील त्या ठिकाणी जावून पाहिले असता तलाठी व कोतवाल चालकाला वाळूबाबत त्याचेकडे पावतीची विचारणा करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, चालकाने त्याचेकडे कोणतीही पावती किंवा रॉयल्टीची पावती नसल्याचे सांगितले आणि खोसे यांनी चालकाला त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव दादा घोडके रा.कळंब असे सांगून

मालकाबाबत विचारले असता टिपर शब्बीर शेख, रा.कळंब यांचा असल्याचे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, चालकाला टिपरमध्ये वाळू कोठून भरली आहे असे विचारत असताना त्याने टिपर चालू करून बारामती बाजूकडे पळवून नेला. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी तलाठी, कोतवाल यांनी मोटारसायकलवरून त्याचा पाठलाग केला त्यानंतर मी माझे कामाला निघून गेलो. हे म्हणणे खरे नाही की, दुसरे दिवशी समजले की, तलाठी खोसे यांनी पोलीस स्टेशनला झालेल्या प्रकाराबाबत तक्रार दिली, सदरचा प्रकार माझेसमक्ष झाला असून तो बरोबर आहे. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ वाचून दाखविला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता. पोलीसांनी तो तसा का नमूद केला याचे कारण मला सांगता येणार नाही. आरोपी व मी एकाच परिसरात राहणारे आहोत.

उलटतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे श्री.एच.डी.नरुटे, विधीज्ञ यांचेमार्फत –**

३. उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–
**( ए. बी. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.०२/०३/२०२६**